# भारत – अमेरिका द्विपक्षीय संबंध : तणाव ते सहकार्याचे नवे पर्व

डॉ. सुखदेव एस. उंदरे, डॉ. पंजाबराव देशमुख विधी महा., अमरावती

---

भारत-अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय संबंधांना ऐतिहासिक आधार आहेत. उभय देशातील परस्पर संबंधाचा इतिहास हा जवळपास १८ व्या शतकाच्या पूर्वार्धापासूनचा मानला जातो. या कालखंडात भारत देश हा ब्रिटिश साम्राज्याच्या अधिपत्याखाली असल्यामुळे द्वीपक्षीय संबंधाची व्याप्ती ही मर्यादित स्वरूपाची होती व त्यामुळे भारत-अमेरिका संबंधांना फारसे महत्त्व नव्हते. परंतु खऱ्या अर्थाने भारत अमेरिका परस्पर द्विपक्षीय संबंधांना सुरुवात झाली ती भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच. १९४७ पासून उभय देशांतील राजनयीक संबंध दोन स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र-राज्य म्हणून प्रस्थापित झाले. परंतु हा कालखंड शीतयुद्धाचा असल्यामुळे व उभय देशांतीलविचारधारा या भिन्न असल्यामुळे आंतरराष्ट्रीय व विवादित विषयांवर सतत होणारे मतभेद त्यांच्यातील तणावाचे कारण होते. त्यामुळे शीतयुद्धाचा कालखंड हा उभय देशांतील द्विपक्षीय संबंधासाठी सतत तणावग्रस्त व चढ-उताराचा राहिला होता. परंतु शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर उभय देशातील संबंधांना नवा आयाम प्राप्त झाला. शीतयुद्धानंतरचा बदलता घटनाक्रम ज्यामध्ये विशेषतः भारत-पाकिस्तानमधील कारगील युद्धात भारताच्या भूमिकेचे समर्थन, राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांची भारत भेट, वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील दहशतवादी हल्ला, भारत-अमेरिका नागरी करार, भारतीय संसदेवरील हल्ला, मुंबईवरील हल्ला, जम्मू-काश्मीर संबंधी अमेरिकेने बदललेली भूमिका अशा सर्व घटनांमध्ये अमेरिकेने भारताचे समर्थन केले. त्यामुळे या दोन्ही राष्ट्रातील संबंध निश्चितपणे सहकार्याच्या दिशेने जात आहेत. भारत व अमेरीकेतील शीतयुद्धोत्तर द्विपक्षीय संबंध हे संघर्षाकडून सहकार्याच्या दिशेने होत असलेल्या परिवर्तनाचे निदर्शक असून असे परिवर्तन होण्यामागे जबाबदार घटक, उभय देशातील संबंधांमध्ये सहकार्याचे पर्व का ? कसे ? केंव्हा ? असे जिज्ञासायुक्त प्रश्न समस्येच्या रुपाने समोर येतात. या पार्श्वभूमीवर भारत-अमेरिका द्विपक्षीय संबंधांचे प्रस्तुत शोध पत्रातून वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्यात आले आहे.

**भारत - अमेरीका यांच्यातील द्विपक्षीय संबंधांना सुरुवात :**

संयुक्त राज्य अमेरीका व भारत यांच्यातील द्विपक्षीय संबंधांना भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. भारताच्या स्वातंत्र्यलढयामध्ये अमेरीकेचे कोणतेही योगदान नव्हते, उलट नेहरुंसह अनेक भारतीयांचा अमेरीकेकडे बघण्याचा दृष्टीकोण हा साम्राज्यवादी देश असाच बनला होता. या कालखंडात संयुक्त राज्य अमेरीका व सोविएत रशिया या दोन महासत्तांमध्ये नुकतेच शीतयुद्ध सुरु झाले होते. अशावेळी भारतने अलिप्ततावादी धोरण स्वीकारले होते. भारताने स्वीकारलेले हे धोरण अमेरीकेला अजिबात पटणारे नव्हते. कारण अमेरीकेची ही स्पष्ट भूमिका होती की, जे देश अमेरीकेच्या सोबत नाहीत, ते अमेरकेच्या विरोधी आणि साम्यवादींच्या सोबत आहेत या संदर्भामध्ये अमेरीकेचे तत्कालिन परराष्ट्र सचिव इलेस यांनी म्हटले होते की, "भारतामध्ये सोविएत साम्यवाद हा हिंदू सरकारच्या माध्यमातून आपल्या प्रभावाचा विस्तार करीत आहे".[१] यावरुन उभय देशातील परस्पर द्विपक्षीय संबंध हे भविष्यात कुठल्या दिशेने जाणार हाते याचे संकेत स्पष्ट झाले होते.

शीतयुद्धकाळात भारत-अमेरिका संबंध हे फारसे समाधानकारक स्वरूपाचे नव्हते. अमेरिका-पाकिस्तान संबंध, काश्मीर समस्या संबंधी अमेरिकेची पाकिस्तान समर्थक भूमिका, पाकिस्तानला अमेरिकेकडून लष्करी क्षेत्रात होणारी प्रचंड मदत, गोवा प्रश्नासंबंधी अमेरिकेची भारतविरोधी भूमिका, नि:शस्त्रीकरणासंबंधीचे अमेरिकेचे धोरण, भारताच्या घ्स्वतंत्र आण्विकङ धोरणावर अमेरिकेची भूमिका, भारताच्या अलिप्ततावादावर टीका आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भारत-सोव्हियत मैत्रीचे संबंध व त्यांच्यात झालेला दीर्घ स्वरूपाचा मैत्री करार इत्यादी कारणांमुळे शीतयुद्धकाळात उभय देशातील संबंध तणावपूर्ण बनले होते.

शीतयुद्धोत्तर कालखंड हा दोन्ही देशातील संबंधाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. शीतयुद्धाची समाप्ती आणि सोव्हिएत संघाचे पतन या प्रमुख घटनांचा दोन्ही राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर व त्यांच्या परस्पर संबंधावर सकारात्मक परिणाम झाला. यामुळे दोन्ही राष्ट्रातील संबंधात एका नवीन अध्यायास सुरुवात झाली. शीतयुद्धोत्तर कालखंडाचे वर्णन 'तणावाकडून सहकार्याकडे' असे केले जाते. शीतयुद्धाचा ॱहास व सोव्हिएत संघाचे पतन यामुळे जगातील द्वितीय महायुद्धानंतर अमेरिका एकमेव महासत्ता बनली. याचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रत्यक्ष-अप्रत्यरित्या परिणाम झाला.

जागतिकीकरण आणि भारताने स्विकारलेले आर्थिक उदारीकरण याचा एक निश्चित परिणाम भारताच्या परराष्ट्र धोरणावर झाला. शीतयुद्धाचा अंत आणि सोव्हिएत संघाचा अस्त यामुळे जागतिक राजकारणाचे समिकरण बदलून गेले. '१९९० नंतर भारताच्या बदलत्या परराष्ट्र धोरणामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे केंद्रस्थानी ठेवून विचार होवू लागला.'[२] भारत अमेरिका ही दोन्ही राष्ट्रे सर्वात मोठे लोकशाही राष्ट्रे आहेत, त्यामुळे या राष्ट्रातील संबंधांचा परिणाम हा जागतिक राजकारणावर पडणे स्वाभाविक ठरते. १९९०च्या दशकानंतर साधारणत: जगातील सर्वच राष्ट्रांनी राजकीय हितसंबंधापेक्षा आर्थिक हितसंबंधाला महत्व दिले, यास भारत-अमेरिका हे अपवाद नव्हते. विचारधारेपेक्षा आर्थिक हितसंबंधावर भर देण्यात येऊ लागला. 'भारताची अर्थव्यवस्था समाजवादाकडून भांडलवादाकडे झुकू लागल्यामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात व्यावसायिक हितसंबंधांना महत्त्व प्राप्त झाले.'[३] परिणामी, अमेरीकेच्याही भारत विषयक दृष्टीकोणात बदल होवू लागल्याने उभय राष्ट्रांतील परस्पर संबंधांना सकारात्मक वातावरण प्राप्त झाले. बदलत्या परिस्थितीचा दोन्ही राष्ट्रांनी विचार करून द्विपक्षीय राजकीय, आर्थिक, तांत्रिक, व्यापारी संबंध वृद्धींगत करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलण्यास सुरूवात केली. विशेषत: दोन्ही देशांनी राजकीय संबंधापेक्षा अधिक महत्त्व आर्थिक हितसंबंधांना दिले. परिणामत: परस्पर सहकार्याचे वातावरण निर्माण झाले. शीतयुद्धोत्तर कालखंडात अमेरिकेचा दृष्टिकोन केवळ भारतासाठीच बदलला नाही तर संपूर्ण दक्षिण आशियाई राष्ट्रांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. शीतयुद्धानंतर अमेरिकेने भारताला विशेष महत्त्व देण्यास सुरूवात केली. जगात जागतिकीकरणाचा प्रारंभ झाला आणि त्यामुळे आर्थिक संबंधाला महत्त्व प्राप्त झाले. याचाच परिणाम भारताकडे पाहण्याचा अमेरिकेचा दृष्टिकोन खूप बदलला. भारताच्या या धोरणाचे अमेरिकेने कौतुक केले. देशाच्या हितासाठी अमेरिकेसोबतच संबंध दृढ किंवा मौत्रीपूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

भारत-अमेरिका यांच्यातील शीतयुद्धोत्तर संबंध हे केवळ दोन राष्ट्रांपुरतेच महत्त्वाचे नसून संपूर्ण दक्षिण आशियाई खंडाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. या उभय देशातील वाढत्या संबंधांचा परिणाम आशिया खंडातील सत्ता समतोलाच्या राजकारणावर पडणार आहे. तसेच भारत-अमेरिका संबंधात सहकार्य वाढल्यामुळे चीन व पाकिस्तान यांचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो आहे. आशिया खंडात चीनच्या वाढत्या आक्रमतेचे आणि विस्तारवादी धोरणाचे प्रतिरोधन करणे हे भारत-अमेरिका सहकार्यातले एक महत्त्वाचे सुत्र असून दहशतवादाचा प्रसार रोखणे हेदेखील भारत-अमेरिका संबंधातील सहकार्यामागील महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. भारत-अमेरिका यांच्या संबंधातील वाढते सहकार्य चीन व पाकिस्तान या राष्ट्रांना प्रभावित करीत आहेत.

११ व १३ मे १९९८ ला भारताने पोखरण येथे आण्विक चाचण्या केल्यानंतर अमेरीकेने आर्थिक लगोलग निर्बंध भारतावर लादले आणि त्याचबरोबर जवळ २०० भारतीय संस्था व कंपन्यांना काळ्या सुचीमध्ये टाकले गेले. मार्च,२००० मध्ये राष्ट्रपती क्लिंटन यांनी भेट दिली. या भेटीपूर्वी प्रतिबंधीत करण्यात आलेल्या जवळपास ५१ प्रतिबंधीत संस्था व कंपन्यांवरील प्रतिबंध उठवण्यात आले होते. या भेटीदरम्यान उभय देशांनी आपल्या भविष्यकालीन वाटचालीच्या दृष्टीने एका दृष्टीकोन पत्रावर स्वाक्षरी केली. यानुसार दोन्ही देशांच्या शासनाध्यक्षांमध्ये नियमित स्वरुपाची शिखर बौठक संरक्षण व आण्विक अप्रसारावर चर्चा, दहशतवादी कार्यवाह्यांवर आळा घालण्यासाठी परस्पर सहकार्याबरोबरच अन्य मुद्यांवरील चर्चा व समाधान यावर सहमती व्यक्त करण्यात आली. यावेळी कारगील संदर्भात क्लींटन यांनी स्पष्टपणे भारताचे समर्थन केले.

जून,२००५ मध्ये परस्पर संरक्षण संबंधांना दृढता प्रदान करीत वाशिंग्टन येथे एका नविन संरक्षण (New framework for us India Defence relationship) या करारावर स्वाक्षरी करण्यात आली. जूलै,२००५ मध्ये भारताचे प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांनी अमेरीकेला भेट दिली. या भेटीदरम्यान उभय देशंमध्ये ऐतिहासिक असा आण्विक उर्जा करार करण्यात आला. मनमोहन सिंग यांच्या भेटीनंतर मार्च, २००६ मध्ये अमेरीकन राष्ट्रपती जॉर्ज डब्ल्यू बुश यांनी भारताला भेट देऊन उभय देशांदरम्यान झालेल्या आण्विक करारांचा अंतिम टप्पा पूर्ण केला. या भेटी दरम्यान आण्विक उर्जा कराराअंतर्गत भारताने आपल्या असौनिक उपयोगाच्या आण्विक संयंत्रांना आंतरराष्ट्रीय आण्विक उर्जा संस्थेच्या देखरेखीखाली आणण्यास मान्यता दिली. या करारामुळे भारत व अमेरीकेतील द्विपक्षीय संबंधांना बळकटी मिळाली. पुढे अमेरीकेमध्ये सत्तांतर होऊन राष्ट्रपती बनलेल्या बराक ओबामा यांच्या कार्यकाळात देखील भारत-अमेरीकेतील संबंधांना संरक्षण, व्यापार व वाणिज्य क्षेत्रामध्ये एक सकारात्मक उंची गाठावयास मदत झाली.

आज जगात जेवढी राष्ट्र-राज्य म्हणून अस्तित्वात आहेत. त्या प्रत्येक देशाच्या परराष्ट्र धोरणाची आपापल्या राष्ट्रीय हितानुसार काही उद्दिष्टे ठरलेली आहेत. स्थळकाळ परिस्थितीनुसार परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे ठरविली जातात. त्याचप्रमाणे संयुक्त राज्य अमेरीकेने आपल्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे बदलत्या शीतयुद्धोत्तर राजकारणात बदलली आहेत. विशेषत: शीतयुद्धोत्तर अमेरीकेच्या दक्षिण-आशियाई राष्ट्रासंबंधीच्या धोरणात बदल झाल्याचे अभ्यासक मानतात. कारण ह्याच बदलत्या उद्दिष्टांच्या आधारे दक्षिण-आशियाई उपखंडा संबंधीचे धोरणही आखले जाते ती उद्दिष्टे पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतात.

१) 'आर्थिक आणि व्यापारी हितसंबंधाच्या रक्षणाला महत्त्व देणे.

२) जागतीक पातळीवर आर्थिक उदारीकरण आणि लोकशाहीचा प्रसार घडवून आणणे.

३) आंतरराष्ट्रीय पातळीवरील अण्वस्त्रांचा वाढता प्रसार रोखणे.

४) अमेरीकेच्या आर्थिक व व्यापारी आणि राजकीय हितसंबंधांच्या रक्षणासाठी प्रयत्न करणे.'[४]

अशाप्रकारे शीतयुद्धोत्तर बदलत्या परिस्थितीनुसार अमेरीकेने विशेषत: दक्षिण-आशिया विषयक धोरणाच्या उद्दिष्टांमध्ये बदल घडवून आणले आहेत. ही उद्दीष्टे साध्य करण्यासाठी अमेरीकेने भारतासोबत आर्थिक व्यापारी संबंध सुधारण्याच्या प्रयत्नांवर भर दिला. त्याचबरोबर भारतासह इतरही दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक उदारीकरण व लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेला प्रोत्साहन देणे, ही दक्षिण-आशियाविषयक अमेरीकन धोरणाची प्राथमिकता बनली होती. शीतयुद्धोत्तर कालखंडात जगातील एकमेव महासत्ता असणा·या अमेरीकेच्या दक्षिण-आशियाई धोरणाला महत्त्व प्राप्त होणे हे निश्चितपणे अमेरीकेच्या आशियाई हितांना पुरकच होते. विशेष म्हणजे भारत हा आशिया खंडातील महत्त्वाचा लोकशाही देश असल्याने व त्याचा 'पाकिस्तान आणि चीन सोबत संघर्ष असूनही भारताची लोकशाही निष्ठा व विकासावरील वाटचाल यामुळे अमेरीकेचे भारतावर विशेष लक्ष केंद्रीत झाले.'[५]

११ सप्टेंबर, २००१ च्या दहशतवादी हल्ल्याने एकमेव महासत्ता असणारा अमेरीका पुरता हादरुन गेला होता. या हल्ल्यामुळे अमेरीकेच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणाला एक वेगळी कलाटणी मिळून 'अमेरीकेला तिच्या भविष्यकालीन हित व सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून आपल्या शक्तीची पुनर्व्याख्या करण्याचे कारण मिळाले.'[६] विशेष म्हणजे या दहशतवादी हल्ल्याची चौकशी करण्यासाठी स्टीफन कोहेन, सॅम्युअल हटींगन्टन व फ्रान्सिस फुकुयामा या महत्त्वाच्या अभ्यासकांचा एक आयोग स्थापन करण्यात आला. या आयोगाने आपल्या अहवालामध्ये अमेरीकेने आपले परराष्ट्र धोरण बदलावे असे सुचविले होते. या पाश्र्वभूमीवर अमेरीकेचे राष्ट्रपती जॉर्ज बुश यांनी नविन आक्रमक धोरण स्वीकारुन आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा बीमोड करणे हे मुख्य उद्दीष्ट मानले. जूलै, २००९ मध्ये अमेरीकेच्या परराष्ट्र मंत्री हिलरी क्लिंटन यांनी भारताला भेट दिली. या भेटीदरम्यान हिलरी क्लिंटन यांनी महत्त्वाचे नेते, अधिकारी व नागरी समाजाच्या काही सदस्यांबरोबर व्यापक चर्चा केली. या वेळी दोन्ही देशांनी आपल्या द्विपक्षीय संबंधांना अधिक विकसीत करण्यासाठी सहा महत्त्वपूर्ण क्षेत्रांना अधोरेखित केले. त्यामध्ये, १) सामरिक सहकार्य (Strategic cooperation), २) उर्जा (Energy), ३) पर्यावरणीय बदल (Climate change), ४) शिक्षण आणि विकास (Educational & Development), ५) कृषी आणि व्यापार (Agriculture & Trade), ६) विज्ञान व तंत्रज्ञान (Science and Technology) या क्षेत्रांना अंतर्भूत करण्यात आले. नोव्हेंबर, २००९ मध्ये स्वच्छ उर्जा व आण्विक क्षेत्रामध्ये सहकार्य वाढविण्यावर भर देण्यात आला. तसेच वायु उर्जा, सौर उर्जा, जैवीक इंधन व कार्बन उत्सर्जन यासारखे क्षेत्रामध्ये सहकार्य करण्यावर सहमती दर्शविली. तसेच हरित भागीदारी, उर्जा सुरक्षा व अन्न सुरक्षा क्षेत्रात उभय देश मिळून कार्य करतील असा निश्चय करण्यात आला. या यात्रेदरम्यान एक महत्त्वपूर्ण घटना म्हणजे 'उभय देशांदरम्यान विद्यापीठ व विद्यापीठांमध्ये कार्यरत शिक्षकांदरम्यान संबंध वाढविण्याकरीता संयुक्त एकविसाव्या शतकातील ज्ञान

प्रस्तावाला विधीवत प्रारंभ केला.'[७] यावेळी एयर मार्शल यांची तौनाती व विमानतळ तंत्रज्ञान यात्रेसह उभय पक्षांनी सहमतीपत्रांवर स्वाक्षरी करून उभय देशांतील नागरी हवाई सुरक्षितता सुदृढ बनविण्याचा मार्ग प्रशस्त केला गेला.

अशाप्रकारे शीतयुद्धोत्तर काळात भारत-अमेरिका संबंधात अतिशय सकारात्मक सुधारणा होत असून उभय देशातील परस्पर सहकार्याचे प्रथम पर्व –१९९१ ते २००० च्या तुलनेत सहकार्याचे द्वितीय पर्व -२००१ ते २०११ मध्ये अधिक रचनात्मक व सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापीत होत आहेत. विशेष म्हणजे सहकार्याच्या दुस·या पर्वामध्ये ज्या पद्धतीने उभय देशांमध्ये परस्पर सामंजस्य प्रस्थापीत व त्यामुळे ज्यामुळे जागतिक लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेस बळ प्राप्त झाले. उभय देशातील व्यापार, वाणिज्य व सामरीक क्षेत्रातील मजबुत होणा·या संबंधांमुळे केवळ अमेरीकेला आशियामध्ये एक सर्वात मोठा लोकशाही मित्र देशच लाभला नाही, तर त्यामुळे अमेरीकेचे दक्षिण आशियासह आशियायी हितच सुरक्षीत होवू शकणार आहे. दुसरीकडे दक्षिण आशियातील आपली भूमिका व स्थान अधिक मजबुत करुन पाकिस्तान व चीन सारख्या कायम सीमावादासंदर्भात कुरघोडी करणा·या राष्ट्रांना भारत-अमेरीरकेतील मैत्रीमुळे शह मिळत असून भारताची एक जागतिक भूमिका देखील महत्त्वपूर्ण बनत आहे. एक लोकशाही देश म्हणून जागतिक लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेला गतिमान करणे व जग अधिक भयमुक्त आणि सुरक्षीत करण्याच्या दृष्टीकोणातून भारताच्या वाढत्या योगदानामुळे भारताची जागतिक स्तरावर महत्त्वपूर्ण भूमिका निश्चित होत आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्राला अधिक जबाबदार बनवून त्याद्वारे व इतर विभागीय व जागतिक संघटनांच्या माध्यमातून भारत व अमेरीका यांच्यातील परस्पर सहकार्याचे धोरण हे पुढील काळात अधिक रचनात्मक व विश्वोन्मुख होणे आवश्यक ठरते. यासाठी भारत-अमेरीकेतील वाणिज्य व व्यापाराचे क्षेत्र अधिक विस्तृत करुनच व उभय पक्षात आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्पर सामंजस्य प्रस्थापीत केले जावू शकेल.

**संदर्भसूची :**

१) सिंहल एस. सी., भारत की विदेशनिति, लक्ष्मी नारायण अग्रवाल, आगरा, २०१७, पृ.२४५.
२) गावस्कर महेश (संपा.), समाज प्रबोधन पत्रिका, ऑक्टो. नोव्हें. २०१८, पृ. ४७२.
३) देवळाणकर शैलेंद्र, भारत आणि जग, सकाळ प्रकाशन, पुणे, २०१५, पृ. १४.
४) गावस्कर महेश (संपा.), समाज प्रबोधन पत्रिका, ऑक्टो. नोव्हें. २०१८, पृ. ४२४.
५) देवळाणकर शैलेंद्र, भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७, पृ.३१२.
६) दत्त व्ही. पी., बदलती दुनिया में भारत की विदेश नीति, हिंदी माध्यम कार्यान्वयन निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय, २००३, पृ. ७८.
७) घई ., यु. आर., भारतीय विदेश नीति, न्यू एकेडमी पब्लिशिंग कंपनी जालंधर, २०१३, पृ. २०५.